आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र दुपारी १.३० वाजता

२४ मार्च २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशात सर्वत्र होलिकोत्सवाचा उत्साह
- संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी लेहमधे सैनिकांसमवेत साजरी केली होळी
- योग्य वेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय आणि आर्थिक सुधारणांमुळे देश कोविड संकटातून लवकर सावरला असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- भारतीय इक्विटी बाजारात गेल्या महिनाभरात सुमारे ३८ हजार कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक
- उन्हाळ्यात रुग्णालयातील आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि राष्ट्रीय आपत्ती प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना जारी

  **आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात टायटन्स बरोबर अहमदाबादमध्ये तर राजस्थान रॉयल्सचा सामना लखनऊ सुपर जायंटस बरोबर जयपूरमधे रंगणार

**<><><><><>**

होळीचा सण आज देशभर मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. उत्तरेकडच्या राज्यांमध्ये होलिकात्सवाचा वेगळाच उत्साह पाहायला मिळतो. पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासह देशाच्या सर्वच भागात होलिकात्सवाचा उत्साह दिसून येत आहे. मुंबई पुण्यात असलेल्या उत्तर भारतीयांसाठी भारतीय रेल्वेने अनेक विशेष रेल्वेगाड्या चालवल्या आहेत. परदेशातही होळीचा सण साजरा होत आहे. श्रीलंकेत काल विवेकानंद सांस्कृतिक केंद्राच्या वतीने होलिकोत्सव साजरा

करण्यात आला. यामध्ये अनेक श्रीलंकन नागरिकही सहभागी झाले होते. भारतातील सिंगापूरच्या दूतावासानेही भारतीयांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सिंगापूरचे राजदूत सिमोन वाँग यांनी एक्सवरुन या शुभेच्छा दिल्या असून आपल्या पोस्टमध्ये उत्तर प्रदेशातील बारसाना इथल्या होळीचे काही फोटोही शेअर केले आहेत. परराष्ट्रमंत्री डॉ. एस जयशंकर सध्या सिंगापूरच्या दौऱ्यावर असल्यानं या संदेशाचं विशेष औचित्य आहे.

देशभरात उद्या होणाऱ्या धुळवडीचीही जोरदार तयारी पाहायला मिळत आहे.

महाराष्ट्रात विशेषतः कोकणात काल पासूनच होळीच्या पालख्या आणि होलिकादहनाची तयारी सुरु झाली आहे. अनेक चाकरमानी होळी निमित्त आपापल्या गावी गेले आहेत. त्यांच्यासाठी कोकण रेल्वेनं आणि राज्य परिवहन मंडळानं खास गाड्याही सोडल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागरिकांना होलिकादहन आणि उद्याच्या धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा समाजमाध्यमावर दिल्या आहेत.

**<><><><><>**

सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज लेहमधे सैनिकांबरोबर होळी साजरी केली. देशाच्या सीमांचं रक्षण करण्यासाठी सैनिक सज्ज असल्यामुळेच देशवासियांचं आयुष्य सुरक्षित असल्याचं ते म्हणाले. कर्तव्यपालनासाठी आपल्या कुटुंबापासून दूर राहणारे हे सैनिक प्रत्येक भारतीय कुटुम्बाचा भाग आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

योग्य वेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय आणि आर्थिक सुधारणांमुळे देश कोविड संकटातून लवकर सावरला असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज बंगळुरु इथं थिंकर्स फोरम या संस्थेतर्फे आयोजित एका सत्रात बोलत होत्या. जागतिक समुदायानंही भारताच्या महामारीच्या काळातल्या कामाचं कौतुक केलं असून भारत वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचही त्यांनी यावेळी सांगितले. कोविड काळात आणि नंतरच्या रशिया युक्रेन युद्धामुळे अनेक देशांत अन्नधान्य, इंधन आणि खतांच्या किंमतीत वाढ झाली. अनेक देशांना त्यासाठी अतिरिक्त निधी द्यावा लागला मात्र भारतानं याच काळात गरीबांना मोफत अन्नधान्य दिलं. देशातील उद्योजक, शेतकरी आणि युवकांनी दाखवलेल्या धैर्यामुळे कोविड काळानंतर अर्थव्यवस्था सावरण्यास मदत झाल्याचंही त्यांनी सांगितलं. भारताच्या कोविड काळात सावरण्याच्या कार्यपद्धती जगभरात नावाजली जात असल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

भारतीय समभाग बाजारपेठेत  परदेशी गुंतवणुकदारांनी केलेल्या गुंतवणूकीत या महिन्यात लक्षणीय वाढ दिसून आली.  फेब्रुवारीत १ हजार ५३९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय समभागात ३८ हजार कोटींची गुंतवणूक परदेशी गुंतवणूकदारांनी केली आहे. जागतिक बाजारातली सुधारणा आणि भारतातल्या व्यापक  आर्थिक सुधारणांमुळे भारतातील संभाव्य तेजीकडे आकर्षित होत परदेशी गुंतवणूकदारांचा कल भारतात गुंतवणूक  करण्याकडे असल्याचं दिसत आहे.

समभागांव्यतिरिक्त कर्जरोखे बाजारातही १३ हजार २२३ कोटी रुपयांची गुंतवणूक परदेशी गुंतवणूकदार फंडांनी केली आहे.

**<><><><>**

इंधनावरचं वाढतं अवलंबित्व आणि इंधनाची वाढती कमतरता याकडे लक्ष वेधलं जावं म्हणून मार्च महिन्याच्या शेवटच्या शनिवारी अर्थ अवर साजरा केला जातो. अर्थ अवर निमित्त काल रात्री साडेआठ ते साडेनऊ या वेळेत गरजेशिवाय जळणारे दिवे आणि इतर विजेवर चालणाऱ्या उपकरणांंचा वापर टाळला गेला. यातून दिल्लीत २०६ मेगावॅट वीजबचत झाली. दिल्लीसोबतच मुंबई, लंडन, लॉस एंजलिस, सिंगापूर, दुबई या सर्व ठिकाणी गरज नसलेले दिवे आणि वीजेवरच्या उपकरणांचा वापर तासभर थांबवून अर्थ अवर साजरा झाला.

**<><><><>**

उन्हाळ्यात रुग्णालयात लागणाऱ्या आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि राष्ट्रीय आपत्ती प्राधिकरणाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातल्या रुग्णालयासाठी संयुक्त मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. रुग्णालयांची सर्वसमावेशक अग्निसुरक्षा ऑडिट आणि प्रत्यक्ष तपासणी करणे, अग्नी धोक्याचा अलार्म, धूर शोधक यंत्र, फायर हायड्रंट्स आणि फायर लिफ्ट्ससह अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध आहे आणि ती पूर्णपणे कार्यरत आहे, याची खात्री करणे.

अपुऱ्या विद्युतभार क्षमतेमुळे निर्माण होणार्या समस्यांचे निराकरण करणे, इत्यादींचा समावेश आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता राजस्थान रॉयल्सचा सामना लखनऊ सुपर जायंटस बरोबर होणार आहे. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर हा सामना होणार आहे.

आज संध्याकाळी साडेसात गुजरात टायटन्स विरुद्ध मुंबई इंडियन्स हा सामना अहमदाबादमध्ये खेळवला जाणार आहे.

काल कोलकात्याच्या इडन गार्डन्स इथं संध्याकाळी झालेल्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सनं सनराईजर्स हैद्राबाद चा ४ धावांनी पराभव केला. कोलकाता नाइट रायडर्सनं विजयासाठी २०९ धावाचं लक्ष्य ठेवलं होतं मात्र हैद्राबादच्या संघाला २० षटकात केवळ २०४ धावाचं करता आल्या.

<><><><><>

आगामी थॉमस आणि उबेर करंडक स्पर्धेसाठी जागतिक बँडमिंटन फेडरेशननं लढतींची यादी जाहीर केली आहे. चीनच्या चेंगडू इथं होणाऱ्या या स्पर्धेत भारताचे सामने इंडोनेशियाच्या संघाबरोबर होणार असून सी गटामध्ये थायलंड आणि इंग्लंडच्या खेळाडूंचा त्यांना सामना करावा लागेल. भारतीय संघानं २०२२ मध्ये इंडोनेशियाला हरवत थॉमस कप जिंकून इतिहास घडवला होता.

दरम्यान उबेर करंडक स्पर्धेत भारताच्या महिला खेळाडूंना अ गटात स्थान देण्यात आलं असून त्यांच्या बरोबर चीन, कॅनडा आणि सिंगापूरचे संघ आहेत.

<><><><><>

जागतिक टेबल टेनिस फीडर बैरुत या टेबल टेनिस खेळाच्या लेबनॉनमध्ये आज होणार असलेल्या मिश्र दुहेरीच्या सामन्यात भारताच्या सत्यन ज्ञानशेखरन आणि मनिका बात्रा यांची आकाश पाल आणि पोमेंती बैस्य यांच्या विरोधात लढत रंगेल. पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात मनुष उत्पलभाई शहा आणि मानव विकास ठक्कर ही जोडी मुदित दानी आणि आकाश पाल यांच्या विरुध्द खेळेल. महिला एकेरीत श्रीजा अकुला ही दक्षिण कोरियाच्या स्यू ह्यो वोन विरुद्ध खेळेल.

<><><><><>

पंजाबमध्ये, संगरूर जिल्ह्यात अनेक गावांमध्ये बनावट दारूच्या सेवनामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या २१ झाली आहे. वीसहून अधिक जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने या घटनेबाबत पंजाबच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांच्याकडून अहवाल मागवला आहे. दरम्यान, या प्रकरणाचा संपूर्ण तपास करण्यासाठी, राज्य पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्थे साठी अतिरिक्त पोलिस महासंचालक गुरिंदरसिंग धिल्लन यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यीय एस आय टी अर्थात विशेष तपास पथक स्थापन केलं आहे.

<><><><><>

रशियाची राजधानी मॉस्कोमधल्या क्रोकस सिटी हॉलवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्यांची संख्या १३३ वर पोहोचली आहे. रशियन तपास यंत्रणेचा हवाला देत तास या वृत्तसंस्थेने शोध मोहीम सुरू असल्याचं म्हटलं

आहे. रशियन आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, १४७ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याची जबाबदारी इस्लामिक स्टेटशी संलग्न इस्लामिक स्टेट खोरासानने घेतली असली तरी रशियन सुरक्षा सेनेनं दावा केला आहे की हल्लेखोरांचा युक्रेनशी संबंध होता आणि हल्ल्यानंतर ते शेजारच्या देशात जात होते. या हल्ल्यात युक्रेनच्या सहभागाचे आरोप हास्यास्पद असल्याचं युक्रेनकडून सांगण्यात आलं आहे. दरम्यान इस्लामिक स्टेट खोरासानचा दावा विश्वासार्ह असून या हल्ल्यांना युक्रेन जबाबदार नसल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.